CHOOSE THE WORLD YOU WANT

FAIRTRADE

# आपल्या जलवायु प्रतीबद्धतेसाठी  निष्पक्ष रहा  -
# लहान शेतकरी आणि कामगारांमध्ये गुंतवणूक करा

प्रिय जागतिक नेते,

आम्ही जगभरातील  1.8 दशलक्ष फेअरट्रेड शेतकरी आणि कृषी क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांच्या वतीने लिहित आहोत. आम्ही जगभरातील लोकांसाठी अन्न तसेच इतर आवश्यक उत्पादने पिकवतो, ज्याचा आनंद ते एकत्र टेबलवर बसून घेऊ शकतात. परंतु जलवायू  संकटामुळे, वर्षानुवर्षे  दिलेले आश्वासने न पाळल्या

गेल्याने आणि आपल्या पर्यावरणाचे बेपर्वा नुकसान झाल्यामुळे आमची तसे करण्याची क्षमता आता नष्ट झाली आहे.

- आपण उत्सर्जन कमी करण्याचे आश्वासन दिले होते ज्यामुळे जलवायू परिवर्तन होऊन कधी ओला तर कधी कोरडा दुष्काळ पडतो. पण उत्सर्जन धोकादायकपणे वाढत आहे त्या मानाने महत्वाकांक्षा खूप कमी आहेत.
- आपण बदलत्या जलवायू परिवर्तनाच्या पार्श्वभूमीवर सुद्धा आम्हाला खाद्य पिकविण्यासाठी क्लायमेट फायनंस देण्याचे वचन दिले. परंतु आमच्यापर्यंत काहीही पोहोचत नाही.
- आपण व्यापाऱ्याला शोषकाकडून भागीदार बनवण्याचे वचन दिले. पण भागधारक कोट्यवधी कमवत असताना, लाखो शेतकरी दिवसाला एक डॉलरपेक्षा कमी कमावतात.

हवामानाच्या घटना अधिक व्यापक होत आहेत, अलिकडच्या महिन्यांत बदलत्या अत्यंत

हवामानामुळे युगांडामधील विनाशकारी पूरांसह पिकांवर गंभीर परिणाम झाला आहे, (i) मेडागास्कर मध्ये कोरडा दुष्काळ, (ii) आणि  अफ्रीकी महाद्वीपावर  झालेला टोळ हल्‌ला (iii) आफ्रिके मध्ये ह्या वर्षी जानेवारी मध्ये आतापर्यंतचे सर्वात जास्त उष्ण तापमान होते (iv) मध्य अमेरिकेत, चक्रीवादळ इटा आणि आयओटामुळे एकट्या होंडुरासमध्ये $ 22 अब्ज पेक्षा जास्त नुकसान झाले, ज्यामुळे फेअरट्रेड शेतकऱ्यांवर विपरित परिणाम झाला. (v) आयपीसीसी (IPCC) चा नवीन अंदाज आहे की भारतातील आपले सदस्य बांधव अत्यंत उष्णता, दुष्काळ आणि अनियमित पावसाला सामोरे जात आहेत (vi) नक्कीच, ते जगाला आवश्यक असलेले अन्न वाढविण्याच्या आपल्या क्षमतेस हानी पोहोचवते. कारण आपली उपजीविका शेतीशी जोडलेली आहे, आपल्यामध्ये पुन्हा एकदा गरिबी वाढत आहे. पण त्याचा परिणाम अधिक खोलवर जातो. आमच्या जमीन आणि पाण्याच्या नुकसानीच्या संसाधनांसाठी स्पर्धा वाढत आहे आणि शेतकरी आणि कामगार म्हणून आपण सतत वाढत्या सामाजिक आणि आर्थिक ताणांना सामोरे जात आहोत.

ज्या शेतकऱ्यांना बऱ्याचदा सर्वात कमी वेतन दिले जाते, जे सर्वात कठीण परिस्थितीत काम

करतात, त्या स्त्रिया त्यांच्या घरी सर्वात जास्त त्रास सहन करतात. आमच्या तरुणांना या परिस्थितीत शेती करायची नाही आणि आम्ही त्यांना दोष कसा देऊ शकतो? पण नवीन पिढी शेतीकडे 'गरिबीचे जाळे' म्हणून पाहते, आणखी काही नाही, जर अशीच परिस्थिती कायम राहिली तर संपूर्ण जगासाठी अन्न कोण पिकवेल?

अजून एक गोष्ट आहे जी आपल्याला सांगायची आहे, ती म्हणजे, आपण आवश्यक असलेले बदल जगभरातील आमच्या शेतांवर पाहू शकता.

वृक्ष लागवड घानामधील कोको आणि केनिया मध्ये चहा यांना संरक्षण देऊन पुरापासून वाचवते आणि ग्वाटेमालामध्ये मधमाश्यांना वाढीव अन्न उपलब्ध करून देते. आफ्रिका आणि मध्य पूर्व, लॅटिन अमेरिका आणि कॅरिबियन आणि आशिया आणि पॅसिफिकमधील फेअरट्रेड संघ, शेतकऱ्यांना त्यांच्या पिकांचे रक्षण करण्याची गरज कशी आहे हे सांगत आहेत.

आमच्या अधिक जबाबदार खरेदीदारांसह भागीदारी आम्हाला आमच्या शेतांना अधिक सक्रिय

करण्यासाठी तसेच वाहतूक आणि शेत उत्सर्जन कमी करण्यासाठी आवश्यक असलेली गुंतवणूक देत आहे. जेथे फेअरट्रेड व्यवसाय वाजवी किंमती देऊन आमच्या भविष्यात योग्य गुंतवणूक करत आहेत आणि फेअरट्रेड प्रीमियम मुळे आमची क्षमता अधिकच वाढत आहे.

पण नक्कीच, या आवश्यक कामासाठी तुम्हाला पैसे द्यावे लागतील. उदाहरणार्थ, कॉफी च्या झुडुपांमध्ये झाडे लावल्या मुळे त्यांचे उन्हापासून संरक्षण होते, पिकांचे रोगा पासून संरक्षण होते आणि त्यामुळे पुरामुळे नुकसान कमी होऊ शकते - परंतु याचाच अर्थ असा की त्यामुळे उत्पादन खर्च देखील वाढेल. जेव्हा शेतकऱ्याला आपल्या उदरनिर्वाहाचे उत्पन्नही घेता येत नाही, तेव्हा आपण या प्रकारच्या आवश्यक बदलांसाठी वित्तपुरवठा कसा करू शकतो?

आधीच ठरवलेल्या ध्येयांपासून जग केव्हाच मागे पडलेले आहे. 2050 पर्यंत ते बदलण्यास खूप उशीर झालेला असेल. एक समृद्ध, अत्यंत प्रदूषण करणारा देश म्हणून, आपण आता अनुकूलन आणि कपातीच्या खर्चाची भरपाई करण्याच्या आमच्या आश्वासनांची पूर्तता केली पाहिजे. या सर्व कारणांमुळे आपल्याला जलवायूशी संबंधित आपत्ती रोखाव्या लागतील. कार्बन उत्सर्जन कमी करण्याचे आपले वचन आता

नाकारले जाऊ नये. आम्ही 'नेट झिरो' वचनबद्धता स्वीकारणार नाही जी आपल्या स्वतःच्या देशांमधून आयात केलेल्या वस्तू किंवा वाहतुकीतून होणाऱ्या उत्सर्जनाकडे दुर्लक्ष करतात किंवा यामुळे प्रत्यक्ष उत्सर्जन कमी होत नाही. जर आंतरराष्ट्रीय शिपिंग उद्योग हा एक देश असता, तर तो जगातील सातवा सर्वात मोठा उत्सर्जक देश ठरला असता.

आम्ही तुम्हाला आत्ताच कृती करण्याचे आवाहन करतो:

1. क्लायमेट फायनान्ससाठीची आपली $ 100 अब्ज देण्याची वचनबद्धता आता पूर्ण झाली पाहिजे. हे थेट शेतकऱ्यांपर्यंत आणि कामगारांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे, म्हणून आपण झाडे लावू शकतो, अधिक लवचिक पिके घेऊ शकतो, येणाऱ्या वादळांसाठी स्वतःला तयार करू शकतो - आणि जागतिक अन्न पुरवठा अखंड ठेवू शकतो.

2. आपण आपल्या कार्बन उत्सर्जनाबद्दल प्रामाणिक असले पाहिजे आणि वैज्ञानिक सल्ल्यानुसार ते कमी करण्याचे धैर्य ठेवले पाहिजे. तुमच्या नेट झिरो च्या वचनबद्धतेमध्ये लक्ष्य आणि धोरणांचा समावेश आहे किंवा नाही याची खात्री करा,

केवळ तुमचे घरगुती उत्सर्जनच नाही तर आयात केलेल्या वस्तूंमधून सुद्धा उत्सर्जन कमी करेल, (viii) आणि ऑफसेट खरेदी करण्याऐवजी ते प्रत्यक्ष कपातीबद्दल आहेत याची खात्री करा. आपल्या राष्ट्रीय पातळीवर निर्दिष्ट केलेल्या योगदानात विमानचालन आणि शिपिंग (नौका परिवहन) समाविष्ट करणे ही एक आवश्यक पायरी आहे. आम्ही आमची भूमिका बजावण्यासाठी आमच्या खरेदीदारांबरोबर काम करण्यास तयार आहोत, परंतु त्यासाठी आपणास पुढाकार घ्यावा लागेल.

3. भविष्यातील व्यापारी सौद्यां मध्ये निष्पक्ष आणि कमी कार्बन उत्पादनांमधील उच्च-कार्बन व्यापार तसेच जीवाश्म इंधनांचा वापर कमी केला पाहिजे, ज्यामुळे शेतकरी आणि व्यवसायांना स्थिरता मिळेल आणि जलवायू संकटाचा सामना करण्यास मदत होईल.

4. व्यवसायांना शाश्वत पुरवठा साखळींमध्ये गुंतवणूक करण्यास प्रोत्साहित करण्यासाठी, शेतकऱ्यांना रास्त भाव देण्यास आणि त्यांच्या पुरवठा साखळीतील पर्यावरणीय समस्यांची मालकी घेण्यास आम्हाला व्यापार नियम बळकट करण्याची गरज आहे.

आम्हाला योग्य पर्यावरणीय कृती बघायची आहे, जेणेकरून व्यवसायिक जंगलतोड थांबवण्यासाठी कारवाई करू शकतील - आणि आम्हाला ते अशा प्रकारे अंमलात आणायचे आहे की ज्यामुळे शेतकऱ्यांना बिले भरावे लागणार नाहीत. आवश्यक असल्यास, आपण त्यांच्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्यात अयशस्वी झालेल्या व्यवसायांना सक्ती करण्यास तयार असले पाहिजे.

कोविड -19 ने गेल्या दोन वर्षांपासून आपले जग उद्ध्वस्त केले आहे. परंतु जर आपण आता जलवायू संकटाचा सामना करण्यास अयशस्वी झालो तर त्याचे परिणाम आपल्या सर्वांच्या झालेल्या नुकसानीच्या तुलनेत काहीच नाहीत. जगातील अन्न उत्पादकांचे प्रतिनिधी म्हणून, आम्ही तुम्हाला विनंती करतो की तुम्ही या क्षणाचा लाभ घ्यावा आणि आमचा आवाज ऐकावा जेणेकरून आम्ही जागतिक अन्न पुरवठा तसाच ठेवू शकू.

**Signed on behalf of Fairtrade farmers and workers,**

FAIRTRADE AFRICA

**Mr Kouamé N'dri Benjamin-Francklin**

Producer Representative of Fairtrade Africa (FTA)

Board Member of FTA and Chairman of SCOOPS-ECAM, Yamoussoukro, Cote D'Ivoire

CLAC FAIRTRADE

**Mr Miguel Munguía**

Producer Representative of Latin American and Caribbean Network of Fairtrade Small Producers and Workers (CLAC)

President of CLAC and Manager of Educe-Cooperativa

FAIRTRADE NETWORK OF ASIA & PACIFIC PRODUCERS

**Mr Meher Pravakar**

Producer Representative of Network of Asia and Pacific Producers (NAPP)

Board Member of NAPP and Project Director at Pratima Organic Grower Group

For more information, contact:
**media@fairtrade.org.uk**
**communications@fairtradeafrica.net**